अखिल भारतीय स्तरावर संत साहित्यावर उत्कृष्ट साहित्य / वाङमय लिहिणाऱ्या लेखकास प्रतिवर्षी **ज्ञानोबा-तुकाराम** या नावाने पुरस्कार देण्यास व त्या अनुषंगाने येणा-या खर्चास व कार्यनियमावलीस मंजूरी देणेबाबत.....

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग
**शासन निर्णय क्रमांक सासंमं-२०००/ प्र.क्र. १७७ / सां.का.-२**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.**
दिनांक :- ४ जून , २००२.

वाचा - आयुक्त, सांस्कृतिक कार्य यांचे पत्र क्रमांक सांकासं-३६२७, दि.५ जून, २००० व पत्र क्रमांक सांकासं-३७३९, दि. २२ जून, २०००.

**शासन निर्णय :-** महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक वैभव, संत परंपरा, संत वाङमय / साहित्य आणि वेगळेपण कायम राखून भारतातील अन्य राज्यांशी सुसंवाद साधणे, त्यांच्याकडील चांगल्या गोष्टींची देवाण-घेवाण होणे हे मराठी माणसाचे प्रतिनिधीत्व करणा-या महाराष्ट्र राज्याचे आद्यकर्तव्य आहे. या कर्तव्य भावनेतून महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील संत साहित्यावर उत्कृष्ट साहित्य लिहिणा-या लेखकांच्या कामगिरीचा गौरव करण्यासाठी प्रतिवर्षी **ज्ञानोबा-तुकाराम** या नावाने सन २००१ पासून रु.१.०० लाखाचा पुरस्कार देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. विचारांती शासन या शासन निर्णयान्वये अखिल भारतीय स्तरावर संत साहित्यावर उत्कृष्ट संत साहित्य / वाङमय लिहिणाऱ्या एका लेखकास सन २००१ पासून प्रतिवर्षी रु.१,००,०००/- ( अक्षरी रुपये एक लाख फक्त) चा पुरस्कार ज्ञानोबा-तुकाराम या नावाने देण्यास मंजूरी देत आहे. सदर पुरस्कार देण्यासाठी मान्यवर व्यक्तींची निवड करण्यासाठी या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मधील नियमावलीस व परिशिष्ट-ब नुसार पुरस्कार रकमेसह समारंभ आयोजित करण्यासाठी येणाऱ्या एकूण रु.१,२५,०००/- ( रू एक लाख पंचविस हजार फक्त ) एवढया खर्चास मंजूरी देण्यात येत आहे. सदर पुरस्कार सन २००१-२००२ पासून प्रतिवर्षी आषाढी एकादशी किंवा कार्तिकी एकादशीचे औचित्य साधून मुंबई किंवा पंढरपूर येथे आयोजित करण्यात यावा.

२. या योजनेला महासंचालक माहिती व जनसंपर्क, महासंचालनालय ,मंत्रालय,मुंबई यांनी कृपया महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील सर्व राज्यामध्ये त्या भाषेतील प्रमुख वृतपत्रातून तीन वेळा ठळक प्रसिध्दी होईल अशी व्यवस्था करावी. त्यासाठी त्या त्या राज्यातील माहिती व जनसंपर्क कार्यालयांना सूचना द्याव्यात . तसेच आकाशवाणी व दूरदर्शन वरून राष्ट्रीय प्रसारणात तीन वेळा प्रसिध्दी द्यावी.

३.  यासाठी आयुक्त / संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या दुय्यम अधिकाऱ्यास त्यासंबंधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच, पुरस्कार निवड समितीने निवड केलेल्या लेखकास पुरस्कार प्रदान करण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे अधिकार आयुक्त / संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना देण्यात येत आहेत.

४.  **यासाठी परिशिष्ट - ब नुसार येणारा खर्च " २२०५ कला व संस्कृती १०२ कला व संस्कृती यांचे** प्रचालन, (११) (०१) विशेष पुस्तकांना बक्षिसे, (२२०५ ०९ ९५) - १७ बक्षिसे, मागणी क्रमांक एन-३ या लेखाशिर्षाखाली त्या त्या वर्षी मंजूर करण्यात येणाऱ्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

५.  हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक २७३/ अर्थो-५, दिनांक ३-५-२००२ व क्रमांक ५०२/व्यय-१४, दिनांक २६-४-२००२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्र.ता. गौड)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
आयुक्त, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई (वृत्त प्रसिध्दीसाठी)
वित्त विभाग (व्यय-१४/ अर्थसंकल्प ५/१९), मंत्रालय, मुंबई.
कक्ष अधिकारी, (सांका-१ / अर्थसंकल्प ) सा.न्या.सां.का.क्री. व वि.स.विभाग, मंत्रालय, मुंबई.
सह सचिव, मुख्यमंत्र्याचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री / राज्यमंत्री (सांस्कृतिक कार्य ), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती, सां.का.-२.

## अखिल भारतीय स्तरावर संत साहित्यावर उत्कृष्ट वाङ्मय लिहिणाऱ्या लेखकास प्रस्तावित ज्ञानोबा-तुकाराम पुरस्काराकरिता नियमावली.

| | | |
|---|---|---|
| १ | संक्षिप्त शिर्षक व व्याप्ती | अखिल भारतीय स्तरावर संत साहित्यावर उत्कृष्ट साहित्य / वाङ्मय लिहिणाऱ्या लेखकास महाराष्ट्र शासनातर्फे रुपये एक लाखाचा एक पुरस्कार **"ज्ञानोबा - तुकाराम"** या नांवाने देण्यात यावा. |
| २ | उद्दिष्ट | अखिल भारतीय स्तरावर संत साहित्यावर उत्कृष्ट साहित्य / वाङ्मय लिहिणाऱ्या महाराष्ट्रातील / महाराष्ट्राबाहेरील एका ज्येष्ठ साहित्यिकास पुरस्कार देऊन गौरव करणे आणि त्याद्वारे संत वाङ्मयास उत्तेजन देऊन या उद्देशाची सार्थ परिपूर्तता होणार आहे. या पुरस्काराद्वारे भारतातील संत परंपरेची ओळख इतर राज्यातील लोकांस होऊन त्यातील महान प्रबोधनाचा लाभ संतांच्या शिकवणीनुसार सर्वांस लाभेल. |
| ३ | पुरस्कारचे स्वरुप | पुरस्कारात खालील गोष्टींचा समावेश असेल :-<br>अ) रु.१,००,०००/- रोख.<br>ब) शाल व श्रीफळ.<br>क) स्मृतीचिन्ह. |
| ४ | पुरस्काराचे क्षेत्र | अखिल भारतीय स्तरावर संत साहित्यावर विपुल प्रमाणात व उत्कृष्ट लेखन लिहिणाऱ्या फक्त एका व्यक्तीची पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल. |
| ५ | पुरस्कारासाठी पात्रता व निकष | १) अखिल भारतीय स्तरावर संत साहित्यावर चिकाटीने, एकनिष्ठेने सातत्याने प्रदिर्घकाळ लेखन करीत आहेत, अशा महाराष्ट्रातील किंवा महाराष्ट्राबाहेरील ज्येष्ठ, ख्यातनाम आणि आपल्या राज्याला आणि पर्यायाने देशाला गौरव प्राप्त करुन देणारा लेखक पुरस्कारास पात्र असेल.<br>२) असा लेखक की, जो प्रकाशात नसला तरी संत साहित्यातील लेखनात कार्यरत असावा.<br>३) संत साहित्यातील त्यांच्या लेखनातून व त्यांच्या लेखनशैलीतून त्यांची प्रगल्भता, ज्येष्ठता उच्च दर्जाची असावी.<br>४) दरवर्षी या स्पर्धेसाठी पाठवावयाची पुस्तके दिनांक १ एप्रिल ते ३१ मार्च (दोन्ही दिवस धरून ) या कालावधीत प्रकाशित झालेली व प्रत्यक्षात बाजारात उपलब्ध असलेली अशी असावीत. |

५) या स्पर्धेसाठी प्रवेशिका स्विकारण्याचा शेवटचा दिनांक १४ फेब्रुवारी आहे.

६) ही स्पर्धा महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेर अखिल भारतीय स्तरावरील सर्व लेखकांसाठी खुली आहे.

७) या स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी कोणतेही स्पर्धाशुल्क नाही.स्पर्धेच्या प्रवेशिकांसाठी आवश्यक प्रपत्र ( फार्म ) आयुक्त / संचालक सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य ,मुंबई ४०० ०३२ यांच्या कार्यालयात उपलब्ध होतील .

८) या स्पर्धेसाठी हस्तलिखित किंवा टंकलिखित पुस्तकांचा विचार केला जाणार नाही.

९) निवड समितीवरील सदस्यांवर दबाब येतो आहे असे सिध्द झाल्यास ज्या प्रवेशिकाबाबत हा दबाब येत असेल ती प्रवेशिका विचारात घेतली जाणार नाही.

१०) ज्या लेखकांना या योजनेअंतर्गत भाग घ्यावयाचा असेल त्यांनी प्रवेशिका ( प्रपत्र ) बरोबर आपल्या पुस्तकाच्या दोन प्रती अर्जासह आयुक्त / संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय,जुने सचिवालय , महात्मा गांधी मार्ग मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे पाठवाव्यात .स्पर्धेसाठी दिलेल्या पुस्तकांच्या प्रती नंतर स्पर्धकास परत करण्यात येणार नाहीत.

(अ) पुस्तकाचे नांव ( पुस्तक छापल्याप्रमाणे )
(ब) कोणत्या वर्षासाठी प्रवेशिका आहे.
(क) लेखकाचे संपूर्ण नांव (टोपण नांवासह)
(ड) पूर्ण पत्ता
(इ) अल्प चरित्र वाङमय साहित्य ,सद्याचा व्यवसाय
(फ) पासपोर्ट साइजच्या फोटोच्या दोन प्रती
(य) प्रकाशकाचे नांव व संपूर्ण पत्ता
(र) पुस्तक प्रकाशनाचा अचूक दिनांक. हा दिनांक परिक्षक पुस्तके व परिक्षण यांच्याकडे नोदविल्याप्रमाणे आहे असे प्रमाणपत्र लेखक / प्रकाशक यांनी देणे आवश्यक आहे . ( प्रकाशनाची तारीख नमूद न केल्यास प्रवेशिका रद्द करण्यात येईल)

**निवड समिती** : अखिल भारतीय स्तरावर संत साहित्य क्षेत्रातील **"ज्ञानोबा-तुकाराम"** या पुरस्कारासाठी लेखकांची निवड करण्यासाठी खालीलप्रमाणे निवड समिती नेमण्यात येईल.

१) मा. मंत्री (सां.का.) - अध्यक्ष.
२) मा. राज्यमंत्री (सां.का.) - उपाध्यक्ष.

३) प्रधान सचिव / सचिव(सां.का.) - सदस्य.
४) आयुक्त / संचालक
(सांस्कृतिक कार्य.) - सदस्य सचिव.
५) अशासकीय सदस्य - एकूण ५.
( पुरस्कारासाठी प्रस्तावित केलेल्या संत साहित्य या क्षेत्रातील ८ भाषेतील लेखकांतून ५ अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याचे अधिकार शासनाकडे राहतील.)

७ **नावांची शिफारस करण्याची पध्दती.**

अ) लेखकाची निवड अखिल भारतीय स्तरावर संत साहित्य क्षेत्रातील संस्थेकडून शिफारस करण्यात आलेल्या नांवातून सर्वसाधारणपणे करण्यात येईल. तथापि, संस्थेने शिफारस केलेल्या लेखकाचीच पुरस्कारासाठी निवड केली पाहिजे असे बंधन निवड समितीवर व अंतिमतः शासनावर राहणार नाही.

ब) संत साहित्य क्षेत्रातील मान्यवर संस्था अखिल भारतीय स्तरावर लेखकाच्या नांवाची त्याच्या लेखन साहित्यातील लिखाणाबाबत तपशिलवार माहिती देऊन आयुक्त / संचालक सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे अधिकृतरित्या शिफारस करतील.

क) शिफारशीबरोबर साहित्यिकाचे / लेखकाचे पासपोर्ट आकाराची २ छायाचित्रे पाठविण्यात यावीत.

ड) मान्यवर संस्थेने आपली शिफारस "गोपनीय" असे लिहिलेल्या मोहोरबंद पाकीटात घालून आयुक्त / संचालक सांस्कृतिक कार्य, मुंबई यांना विहित केलेल्या तारखेपुर्वी महाराष्ट्रातील किंवा महाराष्ट्राबाहेरील राज्यातील त्यांच्या कार्यालयात पाठवावी.

ए) आयुक्त / संचालक सांस्कृतिक कार्य हे साहित्य क्षेत्रातील मान्यवर संस्थेशी प्रथमतः पत्रव्यवहार करतील.

ग) अपुर्ण शिफारस विचारात घेतली जाणार नाही.

ह) महाराष्ट्रातील किंवा महाराष्ट्राबाहेरील संत साहित्य क्षेत्रातील मान्यवर संस्थेकडून कोणतीही शिफारस न आल्यास आयुक्त/ संचालक सांस्कृतिक कार्य हे स्वतःचे स्तरावरुन या पुरस्काराकरिता संभाव्य सक्षम लेखकांच्या नांवाची सूची **"ज्ञानोबा-तुकाराम"** या पुरस्कारासाठी समितीकडे पाठवतील.

ज) कोणतेही कारण न देता समितीची शिफारस फेटाळण्याचा अधिकार शासनास राहिल.

ल) लेखकाची निवड करण्यापुर्वी महाराष्ट्रातील किंवा महाराष्ट्राबाहेरील राज्यातील मान्यवर संस्थेकडून आयुक्त / संचालक सांस्कृतिक कार्य पत्र पाठवून संत साहित्यावर लेखन करणाऱ्या लेखकांकडून नांवे मागवतील.

| | | |
|---|---|---|
| ८ | **आलेल्या शिफारशींची छाननी** | महाराष्ट्रातील किंवा महाराष्ट्राबाहेरील राज्यातील साहित्य क्षेत्रातील मान्यवर संस्थेकडून शिफारस करुन आलेल्या नावांची छाननी करुन आयुक्त / संचालक सांस्कृतिक कार्य हे नियमानुसार लेखकांची यादी तयार करुन शासन नियुक्त पुरस्कार निवड समितीपुढे ठेवतील. निवड समिती **"ज्ञानोबा-तुकाराम"** या पुरस्कारासाठी एका लेखकाची शिफारस शासनास करतील. |
| ९ | **पुरस्कार जाहीर करणारे प्राधिकारी** | अ) **" ज्ञानोबा-तुकाराम"** या संत साहित्य/वाङमयातील पुरस्कारासाठी निवड समितीची शिफारस महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाकडे पाठविण्यात येईल. त्यास शासनाने मान्यता दिल्यानंतर पुरस्कार जाहीर करण्यात येईल.<br>ब) याबाबत शासनाचा निर्णय हा अंतिम असेल व शासनाच्या अश्या निर्णयाविरुध्द कोणतेही अपील करण्याचा कोणासही कोणताही अधिकार असणार नाही.<br>क) शासनास एखाद्या लेखकास जाहीर करण्यात आलेला पुरस्कार योग्य कारण दर्शवून रद्द करता येईल आणि तसे घडल्यास तो पुरस्कार मिळालेला लेखक सदर पुरस्कार आयुक्त / संचालक सांस्कृतिक कार्य महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना परत करील. |
| १० | **पुरस्काराचे वितरण** | हा पुरस्कार शासनाकडून **" आषाढी एकादशी" अथवा "कार्तिकी एकादशी"** चे औचित्य साधून मुंबई किंवा पंढरपूर येथे प्रदान करण्यात येईल. |

*-*-*

## परिशिष्ट - ब

**शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्रमांक सांसमं-२०००/ प्र.क्र. १७७/ सां.का.-२, दिनांक ४ जून, २००२ चे सहपत्र.**

पुरस्कार प्राप्त व्यक्तीस पुरस्काराची रक्कम व पुरस्कार
प्रदान करण्यासाठी येणाऱ्या आयोजनाचा खर्च.

| | | |
|---|---|---|
| १) मान्यवर लेखकास पुरस्कार रक्कम | - | रु. १,००,०००/- |
| २) मान्यवर पुरस्कार प्राप्त लेखकास मानचिन्ह | - | रु. १०,०००/- |
| ३) मानपत्र, शाल व श्रीफळ | - | रु. ३,०००/- |
| ४) मानपत्रासाठी चांदीचा स्क्रोल | - | रु. ५,०००/- |
| ५) पुरस्कार प्राप्त विजेत्याचा प्रथम वर्गाचा प्रवास / निवास खर्च. | - | रु. ७,०००/- |
| एकूण खर्च | | रु. १,२५,०००/- |

(अक्षरी रुपये एक लाख पंचवीस हजार फक्त)

*-*-*